महाराष्ट्र वन विभाग

# उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालय

एल.बी.एस. मार्ग, तीन हात नाका, नौपाडा, ठाणे (प) ४०० ६०२

ई.मेल dcfwlthane@gmail.com, cfwlthane@mahaforest.gov.in

## जाहिराती विषयी अधिक माहिती

ठाणे वन्यजीव विभागा अंतर्गत तानसा वन्यजीव अभयारण्य, कर्नाळा पक्षी अभयारण्य, फणसाड वन्यजीव अभयारण्य व सुधागड वन्यजीव अभयारण्य या संरक्षित क्षेत्रांत सन 2025-26 मध्ये अभयारण्यातील वन्यजीवांच्या आभ्यासह, वन्यजीव अधिवास विकासाची कामे, ग्राम परिस्थितीकीय विकासाची कामे, वनसंरक्षणाशी संबंधीत न्यायालयीन कामे तसेच निसर्ग पर्यटनाची विविध स्थापत्य कामे यांची नियमीत अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहेत. सदरहू कामे अधिक प्रभाविपणे होण्याच्या दृष्टीने ठाणे वन्यजीव विभागाअंतर्गत तानसा वन्यजीव अभयारण्य, कर्नाळा पक्षी अभयारण्य, फणसाड वन्यजीव अभयारण्य व सुधागड वन्यजीव अभयारण्य येथे Wildlife Biologist, Architect / Legal Advisor / Graphic Designer, Livelihood Expert / Rapid Rescue Team Members या पदांची कंत्राटी पद्धतीने निवड करण्याचे प्रयोजित आहे. त्या करिता इच्छुक उमेदवार यांचे सीलबंद अर्ज उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे नावे दिनांक 25/09/2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालयात स्विकारले जातील.

| पद | कंत्राटी-Wildlife Biologist (वन्यजीव जीवशास्त्र आभ्यासक) |
|---|---|
| पदसंख्या | 02 |
| मानधन | रु. 50,000/- दरमहा सर्व भत्यांसह (प्रवासभत्ता वगळून) |
| पात्रता | 1. अर्जदार विज्ञान शाखेत कमीतकमी 60% गुणांसह पदव्युत्तर पदवी (मास्टर्स डिग्री) धारक असावा.<br>2. वन्यजीव शास्त्र, वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.<br>3. कॅमेरा ट्रॅपिंग, GIS/GPS Mapping, Statistical analysis यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>4. वन्यजीव, अभयारण्याबद्दल तसेच वन व वन्यजीव विषयक कायदे / नियम यांचेबाबत माहिती असावी.<br>5. उत्कृष्ट संभाष कौशल्य असावे. इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.<br>6. संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.<br>7. Wildlife Biologist म्हणून वन्यजीव क्षेत्रात यापुर्वी काम केलेल्या व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे. |
| कामाचे स्वरुप | 1. वन्यप्राण्यांचे वर्तन, पर्यावरणशास्त्र आणि हालचालींचा आभ्यास करणे व प्रबंध तयार करणे.<br>2. धोकाग्रस्त वन्यजीव प्रजातींचे निरीक्षण करणे व माहिती संकलीत करणे.<br>3. अधिवास विकासाची कामे व वन्यजीव परिसंस्था व्यवस्थापन विषयक कामे करणे.<br>4. अभयारण्य क्षेत्र, जमिन, कुरण विकास, गवताळ प्रदेश, माळ यांचे मुल्यांकन करणे व माहिती संकलीत करणे.<br>5. वन व वन्यजीव व्यवस्थापन, वन्यप्राण्यांसाठी पाणवठे, अभयारण्यामध्ये वृक्षारोपण, कुरण विकास यांसारख्या कामांमध्ये क्षेत्रिय कर्मचारी यांना नियमित मार्गदर्शन करणे.<br>6. क्षेत्रिय कर्मचारी यांना वन व वन्यजीव विषयक प्रशिक्षण देणे. |

| | |
|---|---|
| | 7. सेवाभावि संस्था, शाळा, महाविद्यालये, प्रसार माध्यम यांमध्ये निसर्ग जागरुकता निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे नियोजन करणे.<br>8. ठाणे वन्यजीव विभागाअंतर्गत अभयारण्यामध्ये वन्यजीवांशी संबंधीत आभ्यास कार्यक्रम राबविणे, त्यासंबंधी अहवाल तयार करणे, वन्यजीव संनियंत्रण विषयक माहिती नियमितपणे क्षेत्रिय स्तरावरुन संकलीत करणे, MSTrIPES संबंधी पंधरवाडी अहवाल तयार करुन त्यांचे संस्करण करणे.<br>9. ठाणे वन्यजीव विभागाची वेबसाईट, फेसबुक पेज इत्यादी अपडेट करणे व इतर संबंधित विषय.<br>10. विभाग प्रमुख्य यांचे सुचनांनुसार कामाशी संबंधीत इतर कामकाज पाहणे. |
| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालयात दि. 30/09/2025 रोजी 11:00 वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. |

| | |
|---|---|
| पद | कंत्राटी- Architect (वास्तुविशारद) |
| पदसंख्या | 01 |
| मानधन | रु. 60,000/- दरमहा सर्व भत्यांसह (प्रवासभत्ता वगळून) |
| पात्रता | 1. अर्जदार मान्यताप्राप्त विद्यापीठाची वास्तुविशारद पदवी (Architect B.Arch) कमीतकमी 60% गुणांसह धारक असावा.<br>2. Council of Architecture India (CoA) येथे नोंदणी असणे आवश्यक आहे.<br>3. वास्तुकला / लॅन्डस्केप आर्किटेक्चर मध्ये पदव्युत्तर पदवी (मास्टर्स डिग्री) असणा-या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.<br>4. AutoCAD, SketchUp, Revit इत्यादी सॉफ्टवेअरचे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>5. वन्यजीव, अभयारण्याबद्दल तसेच वन व वन्यजीव विषयक कायदे / नियम यांचेबाबत माहिती असावी.<br>6. उत्कृष्ट संभाष कौशल्य असावे. इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.<br>7. Architect म्हणून वन्यजीव क्षेत्रात यापुर्वी काम केलेल्या व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे. |
| कामाचे स्वरुप | 1. आभ्यागत केंद्र, माहिती केंद्र, कॉटेजेस, पायवाटा, वॉच टॉवर्स, निसर्ग पर्यटन केंद्र, संरक्षण कुटी, तसेच इतर पर्यटन सुविधा व विकास कामे यांची संकल्पना यांचे सविस्तर आराखडे तयार करणे.<br>2. वनांतील विविध इमारती, ईको-टुरिझम प्रकल्प, पर्यावरण पुरक संरचना व लॅंडस्केप डिझाईन यांचे आराखडे व मॉडेल तयार करणे.<br>3. वनक्षेत्र पर्यावरण व पर्यटनांच्या दृष्टीने अधिक आकर्षक होण्याच्या दृष्टीने वनविभागाचे अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार 2D/3D Layout व मॉडेल तयार करणे आणी त्याचे सादरीकरणे करणे.<br>4. पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करुन निसर्गाशी सुसंगत रचना सुचविणे.<br>5. कामांचे आराखडे, स्ट्रक्चरल डिटेल्स व विविध स्थापत्य तसेच विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणे.<br>6. सुरु असलेल्या विविध कामांचे पर्यवेक्षण करणे व तांत्रिक मार्गदर्शन करणे.<br>7. वन विभाग, वन अभियंता व इतर संबंधीत घटक यांच्याशी समन्वय साधणे.<br>8. विभाग प्रमुख्य यांचे सुचनांनुसार कामाशी संबंधीत इतर कामकाज पाहणे. |
| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालयात दि. 30/09/2025 रोजी 11:00 वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. |

| पद | कंत्राटी- Legal Advisor (विधी सल्लागार) |
|---|---|
| पदसंख्या | 01 |
| मानधन | रु. 50,000/- दरमहा सर्व भत्यांसह (प्रवासभत्ता वगळून) |
| पात्रता | 1. अर्जदार मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायदे पदवी (Law) कमीतकमी 60% गुणांसह धारक असावा.<br>2. अर्जदार यांचेकडे कमीत कमी 06 वर्षांपर्यंत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे अथवा रायगड जिल्ह्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालयामध्ये (Civil & Criminal Courts) काम केल्याचा अनुभाव असावा.<br>3. कायदे संबंधी दस्तावेज तयार करणेमध्ये प्राविण्य असणे आवश्यक आहे. (Pleadings, Affidavits, appeals and petitions and agreements.)<br>4. वन्यजीव, अभयारण्याबद्दल तसेच वन व वन्यजीव विषयक कायदे / नियम यांचेबाबत माहिती असावी.<br>5. उत्कृष्ट संभाष कौशल्य असावे. इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.<br>6. ठाणे वन्यजीव विभागाअंतर्गत येणा-या अभयारण्य क्षेत्रातील केसेस यांना प्राधान्याने महत्व देणे बंधनकारक आहे.<br>7. Legal Advisor (विधी सल्लागार) म्हणून वन्यजीव क्षेत्रात यापुर्वी काम केलेल्या व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे. |
| कामाचे स्वरुप | 1. वन, वन्यजीव अणि पर्यावरण विषयक कायद्यांचे पालन करण्याबाबत ठाणे वन्यजीव विभागातील सर्व अभयारण्य व अधिनस्त कार्यालये यांना कायदेशीर सल्ला देणे. (भारतीय वन अधिनियम, वन्यजीव संरक्षण अधिनियम, वन (संवर्धन) अधिनियम, पर्यावरण संरक्षण अधिनियम, वन हक्क अधिनियम इं.)<br>2. आस्थापना विषयक न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी यामध्ये वनविभागाला मार्गदर्शन व सल्ला देणे. कार्यवाही ही नियम व कायद्याशी अनुसरुन आहे तसेच राज्य व केंद्र शासनाच्या धोरणांशी सुसंगत असल्याची खात्री करणे.<br>3. वन व वन्यजीव यांचेशी संबंधीत नविन कायदे, सुधारणा आणि न्यायालयीन निर्णयांच्या अर्थ लावणे व कायदेशीर अभिमत देणे.<br>4. ठाणे वन्यजीव विभागा अंतर्गत असलेल्या विविध न्यायालयीन प्रकरणांकरीता Pleadings, Affidavits, appeals and petitions and agreements यांचा मसुदा तयार करुन देणे.<br>5. अनधिकृत वृक्षतोड, अतिक्रमण, वनजमिन वाद, अवैध शिकार, वन्यजीव गुन्हे, अवैध वन्यजीव व्यापार/तस्करी प्रकरणे, मानव वन्यजीव संघर्षाच्या घटना इत्यादी प्रकरणांबाबत यांबाबत कायदेशीर मार्गदर्शन करणे.<br>6. वनपर्यटन, वनीकरण, वनोपज तसेच सामुदायीक उपजिविका प्रकल्पांशी संबंधीत करारांमध्ये कायदेशीर संरक्षण व मार्गदर्शन करणे.<br>7. क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांना वन व वन्यजीव विषयक कायदे / नियम यांचे प्रशिक्षण देणे व नियमित मार्गदर्शन करणे.<br>8. विभाग प्रमुख्य यांचे सुचनांनुसार कामाशी संबंधीत इतर कामकाज पाहणे. |
| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालयात दि. 30/09/2025 रोजी 11:00 वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. |

| पद | कंत्राटी- Graphic Designer |
|---|---|
| पदसंख्या | 01 |
| मानधन | रु. 35,000/- दरमहा सर्व भत्यांसह (प्रवासभत्ता वगळून) |
| पात्रता | 1. अर्जदार कमीतकमी 60% मार्कासह ग्राफिक डिझाईन मध्ये पदवी असणे आवश्यक आहे. (B.des, BFA)<br>2. वन्यजीव, अभयारण्याबद्दल व वनविभागात हाणा-या विविध विकास आराखडे व विकास कामांबाबत सखोल माहिती असावी.<br>3. उत्कृष्ट संभाष कौशल्य असावे. इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.<br>4. संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे. Adobe Photoshop, Auto Cad, Illustrator, InDesign यांसारख्या ग्राफिक फिझाइनच्या साधनांमध्ये प्राविण्य असावे.<br>5. Graphic Designer म्हणून काम केलेल्या व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे. |
| कामाचे स्वरुप | 1. वन आणि वन्यजीव कार्यक्रमांसाठी लोगो, ब्रोशर, पोस्टर्स आणि बॅनर्स तयार करणे.<br>2. अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, पर्यावरण-पर्यटन स्थळे आणि वन मोहिमांसाठी ब्रँडिंग साहित्य डिझाईन करणे.<br>3. जागरुकता मोहिमेसाठी (वन्यजीव संरक्षण, जंगलातील आग प्रतिबंधक, पर्यावरणपूरक पद्धती, शिकार विरोधी मोहीमा) इन्फोग्राफिक्स, चित्रे आणि दृश्य डिझाईन करणे.<br>4. शाळा, निसर्ग पर्यटन केंद्रे, आणि प्रदर्शनांसाठी शैक्षणीक साहित्य तयार करणे.<br>5. ठाणे वन्यजीव विभागाच्या सोशल मिडीया प्लॅट फॉर्मसाठी क्रिएटिव्ह डिझाईन तयार करणे.<br>6. ग्राफिक्स, आयकॉन आणि चित्रांह वेबसाईट्स, मोबाईल ॲप्स आणि ई-लर्निंग प्लॅटफॉर्ममध्ये योगदान देणे.<br>7. वन्यजीव विभागाकडील वार्षिक अहवाल, प्रकल्प, प्रस्ताव आणि सादरीकरणांसाठी आकर्षक लेआऊट तयार करणे.<br>8. अभयारण्यामध्ये सुचना फलक, दिशादर्शक फलक, माहिती फलक व विविध कार्यक्रमांकरीता डिझाईन तयार करणे.<br>9. पर्यावरण व वन्यजीव विषयक ट्रेड फेअर तसेच वन्यजीव जागरुकता कार्यक्रमांसाठी प्रदर्शने तयार करणे.<br>10. विभाग प्रमुख्य यांचे सुचनांनुसार कामाशी संबंधीत इतर कामकाज पाहणे. |
| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालयात दि. 30/09/2025 रोजी 11:00 वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. |

| पद | कंत्राटी- Livelihood Expert (निसर्ग उपजिवीका तज्ञ) |
|---|---|
| पदसंख्या | 02 |
| मानधन | रु. 40,000/- दरमहा सर्व भत्यांसह (प्रवासभत्ता वगळून) |
| पात्रता | 1. अर्जदार विज्ञान शाखेचा कमीतकमी 60% मार्कासह मास्टर्स डिग्री धारक असावा.<br>2. ग्रामिण विकास, समाजशास्त्र, वनिकी, वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र किंवा पर्यावरण शास्त्र या शाखेस प्राधान्य दिले जाईल.<br>3. वन्यजीव, अभयारण्याबद्दल तसेच वन व वन्यजीव विषयक कायदे / नियम यांचे बाबत माहिती असणे आवश्यक आहे.<br>4. शासनाच्या विविध योजना (उदा कॅम्पा, आदिवासी विकास, CSR Project, वनहक्क कायदा इ.) यांचे बाबत थोडक्यात माहिती असणे आवश्यक आहे.<br>5. उत्कृष्ट संभाष कौशल्य असावे. इंग्रजी, मराठी, हिंदी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.<br>6. संगणक हाताळण्याचे कौशल्य असावे.<br>7. Livelihood Expert म्हणून काम केलेल्या व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचे प्रमाणपत्र सोबत सादर करावे. |

| | |
|---|---|
| कामाचे स्वरुप | 1. स्थानिक आणि आदिवासी समुदायासाठी शाश्वत उपजीविकेच्या संधी ओळखून विविध माध्यमांनी रोजगार निर्मिती करणे. (NTFP, वनपर्यटन, हस्तकला, बांबू आधारीत उद्योग, मध, आषधी वनस्पती इं.)<br>2. महिला बचत गट, संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांची निर्मिती करणे व बळकटीकरणे करणे तसेच कौशल्य विकास व क्षमता बांधणीला प्रोत्साहन देणे.<br>3. वन पर्यटनास प्रोत्साहन देऊन उत्पन्नाच्या नवनविन संधी उपलब्ध करुन देणे.<br>4. वन पर्यटन मॉडेल विकसीत करणे. (उदा. मार्गदर्शन केंद्र, निसर्ग परिचय केंद्र, वन विश्राम गृह, वनरस्ते, हस्तकला विक्रि केंद्र)<br>5. स्थानिक नागरीक व आदिवासी समदायातील तरुण / तरुणी यांना निसर्ग मार्गदर्शक, पर्यावरण रक्षक म्हणून प्रशिक्षण देणे.<br>6. स्थानिक आणि आदिवासी समुदाय यांना वन आधारीत उद्योग निर्मितीसाठी प्रोत्साहन दणे व त्यांची उत्पादने बाजारपेठांशी जोडण्याकरीता मदत करणे.<br>7. कॅम्पा, CSR Project विविध योजनां अतर्गत निधीसाठी प्रस्ताव तयार करणे.<br>8. स्थानिक आणि आदिवासी समुदायासाठी पर्यायी उपजीविकेचे स्त्रोत उपलब्ध करुन देऊन मानव-प्राणी संघर्ष कमी करणे.<br>9. विभाग प्रमुख्य यांचे सुचनांनुसार कामाशी संबंधीत इतर कामकाज पाहणे. |
| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत उप वनंसरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालयात दि. 30/09/2025 रोजी 11:00 वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. |

| | |
|---|---|
| पद | **कंत्राटी**- Rapid Rescue Team Members |
| पदसंख्या | 07 |
| मुख्यालय व कार्यक्षेत्र | मुख्यालय-ठाणे, कार्यक्षेत्र-मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे |
| मानधन | रु. 15,000/- दरमहा सर्व भत्यांसह (प्रवासभत्ता वगळून) |
| पात्रता | 1. अर्जदार हा किमान इयत्ता 10 वी उत्तिर्ण असावा.<br>2. अर्जदार शारिरीक दृष्ट्या सक्षम व क्षेत्रिय कामकाजास योग्य असावा.<br>3. त्याचे वय 21 ते 40 वर्ष असावे.<br>4. अर्जदार मुंबई, मुंबई उपनगर किंवा ठाणे येथिल रहिवाशी असावा.<br>5. अर्जदार हा गुन्हेगारी पार्श्वभूमिचा नसावा.<br>6. वन व वन्यजीव विभागात वन्यप्राणी बचाव कामासंबंधी पुर्वानुभव असलेल उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.<br>7. चारचाकी वाहन चालविण्याचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| कामाचे स्वरुप | 1. मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे परिसरातील वन्यप्राणी बचाव कार्य पार पाडणे.<br>2. मुंबई, मुंबई उपनगर व ठाणे परिसरातील बेकायदेशीर वन्यजीव व्यापार वन्यजीव विभागाच्या निर्देशानुसार नियंत्रण ठेवण्यास सहाय्य करणे.<br>3. नियंत्रण अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, (वन्यजीव) मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार वन्यजीव गुन्हे तपास, जप्ती, झाडझडती ई. कामांत आवश्यकतेनुसार सहाय्य करणे.<br>4. आवश्यकतेनुसार बचाव कार्यास नियंत्रण अधिका-यांच्या निर्देशानुसार कार्यालयीन वेळेव्यतिरीक्त तत्परतेने हजर राहणे.<br>5. बचाव कार्य नसल्यास दररोज सकाळी 09.30 ते सायंकाळी 6.30 पर्यंत मुख्यालय ठाणे येथे उपस्थित राहणे.<br>6. वनविभागाद्वारे बचाव कार्यासबंधीत देण्यात येणा-या प्रशिक्षणास व सरावास हजर राहणे.<br>7. उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे व नियंत्रण अधिकारी यांच्या निर्देशानुसार वन्यप्राणी बचावासंबंधी कर्तव्य पार पाडणे.<br>8. विभाग प्रमुख्य यांचे सुचनांनुसार कामाशी संबंधीत इतर कामकाज पाहणे. |

| मुलाखत | अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची मुलाखत उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालयात दि. 30/09/2025 रोजी 02:00 वा. निवड समिती मार्फत घेण्यात येईल. |
|---|---|

टिप:- ही शासकीय नोकरी नसून केंवळ कंत्राटी पध्दतीवर 11 महिन्यांच्या करारावर नियुक्ती आहे. सविस्तर तपशिल व अर्जाचा नमुना www.mahaforest.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी सदर तपशिल पाहून अर्ज करावे. आवश्यक वाटल्यास या विभागाशी संपर्क साधावा.

**A) महत्वाची सुचना**

1) कोणतेही कारण न देता नेमणुक नाकारण्याचा पुर्ण अधिकार निवड समितीकडे राहिल त्याबाबत दाद मागता येणार नाही.
2) Wildlife Biologist व Livelihood Expert यांना ठाणे वन्यजीव विभागातील क्षेत्रिय कामाचे वाटप उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे स्तरावरुन करण्यात येईल. या दोन्ही पदांचे मुख्यालय शहापूर व मजगांव-मुरुड या सहा. वनसंरक्षक यांच्या मुख्यालय स्थळी राहील.
3) Wildlife Biologist व Livelihood Expert या पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांकडे स्वत:चे दुचाकी वाहन (मोटार सायकल) व वाहन चालक परवाना (Driving License) असणे गरजेचे राहील.
4) दुचाकी वाहनाने (मोटार सायकल) केलेल्या प्रवासाचा प्रवासभत्ता मुख्यालयाच्या ठिकाणापासून रु. 3.00 प्रती कि.मी. या दराने अनुज्ञेय राहील.
5) शासकीय वाहनाने केलेल्या प्रवासाकरीता प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
6) क्षेत्रिय कामांच्या भेटी बाबत व केलेल्या कामांबाबत पंधरवाडी अहवाल दैनंदिनी स्वरुपात संबंधीत नियंत्रण अधिकारी यांच्या शिफारशी सह उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.
7) दैनंदिनीचे अवलोकन करुन मासिक अनुज्ञेय मानधन अदा करण्यात येईल.
8) साप्ताहीक 01 सुट्टी वगळता, इतर कोणत्याही शासकीय सुट्या अनुज्ञेय राहणार नाहीत. याव्यतिरीक्त अनुपस्थितीचा कालावधी हा विना मानधन म्हणून ग्राह्य धरण्यात येईल व उपस्थितीच्या कालावधीचे मानधन अदा करण्यात येईल.
9) अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थित राहवयाचे असल्यास संबंधीतांस मुख्यालय सोडतांना नियंत्रण अधिकारी यांची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.
10) विना परवाना सलग 10 दिवस अनुपस्थित असणे ही बाब संबंधीत पदावरचा हक्क गमावणारी असेल.
11) एखादया अर्जदाऱ्याच्या बाबतीत निकष शिथील करण्याचा अधिकार निवड समिती अध्यक्षांचा राहील.
12) Wildlife Biologist, Architect / Legal / Advisor / Graphic Designer, Livelihood Expert/ Rapid Rescue Team Members या पदाकरीता निवड कंत्राटी पध्दतीने 11 महिने इतक्या कालावधीसाठी राहील. तथापि त्यांनी सदर कालावधीमध्ये उत्कृष्ठ काम केल्याचे कामाच्या मुल्यमापनाअंती स्पष्ट झाल्यास त्यांना प्रती वर्ष 10% पर्यन्त मानधन वाढ देवून मुदतवाढ देण्यात येईल. या संबंधी निर्णय घेण्याचे संपुर्ण अधिकारी उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांना असतील. अशी मुदतवाढ 03 वर्षांपेक्षा अधिक कालावधी करीता नसेल.
13) प्रशासकीय कारणास्तव नियुक्तीचे आदेश कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांना असतील.
14) सुरवातीचा 1 महिन्याचा कालावधी हा परीक्षाविधीन कालावधी असेल व सदर परीक्षाविधीन कालावधीतील आपली कामगिरी समाधानकारक दिसून आल्यानंतरच आपली सेवा पुढे चालू ठेवण्यात येईल.
15) ही शासकीय नोकरी नसून केंवळ कंत्राटी पध्दतीवर 11 महिन्यांच्या करारावर नियुक्ती आहे.
16) कोणतेही कारण न देता नेमणुक नाकारण्याचा पुर्ण अधिकार निवड समितीकडे राहिल त्याबाबत दाद मागता येणार नाही.
17) एखादया अर्जदाऱ्याच्या बाबतीत निकष शिथील करण्याचा अधिकार निवड समिती अध्यक्षांचा राहील.
18) विभाग प्रमुख्य यांचे सुचनांनुसार कामाशी संबंधीत इतर कामकाज पाहणे हे बंधनकारक राहिल.
19) ठाणे वन्यजीव विभागा अंतर्गत तानसा वन्यजीव अभयारण्य हे ठाणे व पालघर जिल्हा, कर्नाळा पक्षी अभयारण्य रायगड जिल्हा, फणसाड वन्यजीव अभयारण्य रायगड जिल्हा व सुधागड वन्यजीव अभयारण्य

रायगड व पुणे जिल्हा यांमध्ये विभागलेला असुन, वेळोवेळी आवश्यकतेनुसार सदरहू अभयारण्यांना क्षेत्रभेटी देऊन काम पाहणे गरजेचे आहे. याची पुर्वकल्पना देण्यात येत आहे.

20) Rapid Rescue Team Members यांचा विमा वन्यजीव विभागाद्वारे काढण्यात येईल. तसेच बचाव कार्याकरीता आवश्यक सुरक्षा साहित्यांचा पुरवठा देखिल वनविभागाद्वारे करण्यात येईल.

**B) अर्ज पाठविण्याचा पत्ता व ई-मेल आयडी**

1) अर्जदार हे खालील नमुद पत्त्यावर ऑफलाईन पध्दतीने लिफाफ्यामध्ये पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष हजर राहुन अर्ज सादर करु शकतात किंवा ऑनलाईन पध्दतीने dcfwlthane@gmail.com या ई-मेल आयडीवर अर्ज सादर करु शकतात.

21) **कार्यालयाचा पत्ता** - उप वनसंरक्षक, (वन्यजीव) ठाणे यांचे कार्यालय, एल.बी.एस.मार्ग, तीन हात नाका, नौपाडा, ठाणे (पश्चिम) 400602

-Sd-
राहुल भा. गवई, (भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
(वन्यजीव) ठाणे

# अर्जाचा नमुना

उमेदवाराचा फोटो

प्रति,

मा. उप वनसंरक्षक,
(वन्यजीव) ठाणे

**विषय:-** ठाणे वन्यजीव विभागा अंतर्गत तानसा वन्यजीव अभयारण्य, कर्नाळा पक्षी अभयारण्य, फणसाड वन्यजीव अभयारण्य व सुधागड वन्यजीव अभयारण्य येथे Wildlife Biologist, Architect / Legal Advisor / Graphic Designer, Livelihood Expert / Rapid Rescue Team Members यांची कंत्राटी पध्दतीने निवड करीता विनंती अर्ज. **(नको असलेले खोडावे)**

**संदर्भ** :- वनविभागाच्या वेबसाईटवर / विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डावरील प्रसिध्द झालेली जाहिरात.

**महोदय,**

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशिलावर जाहिरात वाचली असुन, माझा वैयक्तीक तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. संपूर्ण नाव: -
2. जन्मतारीख अक्षरी व अंकी: -
3. संपूर्ण पत्ता व मोबाईल / संपर्क क्रमांक / ईमेल आय.डी: -
4. शैक्षणिक पात्रता: -
5. अनुभव: -

शिक्षण व अनुभवाचे दस्ताऐवज या सोबत सहपत्रीत

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

ठिकाण: -

दिनांक: -

**कंत्राटी तत्वावरील Wildlife Biologist / Architect / Legal Advisor / Graphic Designer / Livelihood Expert/ Rapid Rescue Team Members यांच्याकडून लिहून घ्यावयाचे बंधपत्रामधील अटी व शर्ती**

1. सक्षम प्राधिकारी यांनी सर्व नेमून दिलेले खास कामे व इतर नेहमीची कामे करण्याची जबाबदारी माझ्यावर राहील. माझ्याकडून कामामध्ये दिरंगाई/ टाळाटाळ झाल्यास सदरचा करार रद्द करणेचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.
2. माझे हलगर्जीपणामुळे शासना आर्थिक नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई माझेकडून वसुल करुन घेतली जाणेस माझी हरकत नाही.
3. माझे कंत्राटी कामाचा सहा दिवसांचा आठवडा राहील.
4. सदर कराराचा एकुण कालावधी 11 महिन्यांच्या असुन, कामाची सर्वसाधारण वेळ सकाळी 9.30 ते सांयकाळी 6.30 अशी असेल व आवश्यकतेनुसार ती वाढविण्याच्या संदर्भात कार्यालयास अधिकार असेल.
5. कामाचे स्वरुप व तातडीच्या अनुषंगाने कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहुन विवक्षित काम पुर्ण करण्यास मी तयार आहे.
6. माझेकडे सदर पदासाठी नमुद केलेली आर्हता व संगणक ज्ञान आहे.
7. मी कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करणार असल्यामुळे शासनाच्या सेवेत कायम राहणेसाठी भविष्यात कोणताही दावा/ हक्क सांगणार नाही.
8. सक्षम प्राधिकारी यांना माझा कंत्राटी कामाचा 11 महिन्यांचा कालावधी पुर्ण होण्याच्या अगोदर कारण न देता व कोणतीही पुर्व सुचना/ नोटीस न देता मला कामावरुन काढून टाकणे व करार रद्द करण्याचे अधिकार असतील.
9. माझे कंत्राटी तत्वावरील नियुक्तीचे कालावधीत शासकीय दस्ताऐवज, नस्ती, पत्रव्यवहार यांची गोपनियता मी पाळेन, तसेच सदर शासकीय माहितीचा दुरुपयोग केल्यास त्यास मला पुर्णपणे जबाबदार धरुन प्रचलित नियम व कायद्यानुसार माझेवर सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत कारवाई केली जाईल याची मला जाणीव आहे.
10. माझे कामाचे तास हे कार्यालयीन कामाच्या गरजेनुसार वेळोवेळी सक्षम प्राधिकारी यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे राहतील.
11. माझे विरुध्द कोणत्याही पोलीस ठाणे मध्ये अथवा न्यायालयाचे गुन्हा नोंद नाही. तसे आढळून आल्यास मला कामावरुन तात्काळ कमी करण्यात यावे.
12. बंधपत्र संपल्यानंतर अखत्यारित दिलेले शासकीय दस्ताऐवज, कागदपत्रे, पुस्तके व इतर साहित्य, आपले कार्यालयात जमा करणे व दस्ताऐवजाच्या कोणत्याही प्रती कोणत्याही प्रकारात सोबत घेऊन जाणार नाही. तसे आढळल्यास नियमाने होणाऱ्या कारवाईस मी पात्र राहील.
13. सदरचे पद हे महाराष्ट्र शासन निर्मित पद नाही. सदर पदावर मी कोणताही अनुभवाचा दाखला किंवा अनुभवाचा हक्क अथवा निर्माण होणाऱ्या शासकीय पदावर हक्क सांगणार नाही.
14. सदर करारा दरम्यान मला प्राप्त झालेल्या मानधनाबाबत मी प्रचलित नियमानुसार प्राप्तीकर संदर्भातील माझी वैयक्तिक जबाबदारी पार पाडेन.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती मला मान्य असून मी त्यांचे पालन करण्याचा करार करुन सदरच्या कंत्राटी तत्वावरील कामाकरिता मला देण्यात आलेली नेमणुक स्विकारत आहे.

**उमेदवारांचे नाव व सही**

**ठिकाण** :-

**दिनांक** :-